तळे इंग्लिश स्कुल निर्मिती

स्वा.सै. **प्रभाकर रामकृष्ण देशमुख** हे माणगांव तालुका काँग्रेसचे अध्यक्ष असताना गोरेगांव येथे माणगांव तालुका एज्युकेशन सोसायटी स्थापन करण्यात पुढाकार घेतला होता. पुणे येथील रामचंद्र टुमणे सर, हे **विद्याप्रसारणी सभेचे** आजीव सभासद होते. कुळ कायदा आल्यामुळे खोतानी, तळे येथे शिक्षणसंस्था चालविणे शक्य नसल्याचे सांगितल्यावर ते तळे येथील भागवत गुरुजींकडे राहिले होते. गुरुजींनी ही गोष्ट डॉ. अनंत मो. श्रृंगारपुरे यांना सांगितली. त्यांनी प्रभाकर देशमुख यांना टुमणे सर शाळा सुरु करण्याच्या निमित्ताने येऊन गेल्याचे सांगितले. प्र.रा.देशमुख यांच्याही मनात हायस्कूल काढावयाचे होते कारण मोठया मुलीला शिक्षणासाठी मुंबईत पाठवावे लागले होते.

त्यांनी काँग्रेसप्रेमी लोकांशी चर्चा करुन ग्रामपंचायतीमध्ये मिटिंग घेण्याविषयी डॉ. महादेव जोशी या शिक्षणप्रेमी तरुणास सांगितले. पहिल्या विधानसभेची उमेदवारी, प्रभाकर देशमुख यांना मिळणार असल्यामुळे ग्रामपंचायतीत झालेल्या प्रवर्तकांच्या मिटिंगमध्ये रत्नागिरी हायस्कूलमधून निवृत्त होऊन आलेल्या विठ्ठल जयराम जोशी M.A.या विद्वान गृहस्थाच्या अध्यक्षपद नियुक्तीला, प्र.रा.देशमुख यांनी मान्यता दिली आणि स्वतःकडे उपाध्यक्ष पद ठेवले.

कार्यकारणीवर, पुढील लोकांची एकमताने निवड झाली. गणपत रिसबूड खजिनदार, परशुराम अ. मेकडे सचिव, सखाराम ओलतीकर सह-सचिव, डॉ.अनंत मो.श्रृंगारपुरे, डॉ.महादेव गं.जोशी. रामचंद्र वि.भट, काजी अ.रहिमान तलियाई, जनार्दन सावंत, विनायक सदाशिव वेदक हे सभासद होते.

संस्थेचे नांव तळे इंग्लिश स्कूल ठेवले पहिल्या वर्षी फक्त १३ विद्यार्थी-विद्यार्थीनी होत्या. **वर्ग मार्च १९५१ मध्ये सुरु झाला.** विद्यार्थी संख्या कमी असल्यामुळे संस्थेची धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणी केली नाही.

लोकसभेसाठी भारताचे अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख व विधानसभेसाठी प्र.रा.देशमुख व राखीव विधानसभा जागेसाठी द.मा.तळेगांवकर यांना उमेदवारी मिळाल्यावर प्रचारासाठी सी.डी.देशमुख तळे येथे आले आणि यांनी हायस्कुलच्या वर्गाला भेट दिली ती शाळा सीडींचे चुलते नाथा देशमुख यांच्या घरी भरत होती. तळे येथील वरील तिन्ही उमेदवार निवडून आले. प्र.रा.देशमुख विधानसभेवर निवडून आल्यामुळे शाळेच्या दैनंदिन कामाकडे डॉ.म.गं. जोशी व प.अ.मेकडे यांनी लक्ष दिले.

शाळेचे विद्यार्थी वाढल्यावर शाळा, यशवंत भट व अ.पां.साठे यांच्या पेशवेकालीन हवेलीत भरु लागली. अनुदान मिळण्यासाठी गोरेगांव येथील माणगांव ता. एज्युकेशन सोसायटीशी संलग्नता घेतली. १९५७-५८ साली शालांत परीक्षेचा वर्ग सुरु करताना शासनाने ५,००० रुपये डिपॉझिट मागितले. यशवंतराव भट निवृत्त होऊन कलकत्त्याहून तळे येथे आले होते. त्यांनी संस्थेची गरज भागविली.

शाळेसाठी इमारत बांधण्याचे व नोंदणीकृत संस्था स्थापन करण्यासाठी आदर्श शिक्षण संस्था स्थापन केली परंतु भा. गो.साठे यांनी धर्मादाय आयुक्तांकडे आदर्श शिक्षण संस्थेत सर्वसमावेशकता नाही, असे आरोप करीत कोर्टाकडून अडथळे आणल्यामुळे ती संस्था कार्यरत राहिली नाही.

१९५७ मध्ये महाराष्ट्र प्रांतिक-काँग्रेसने, विधानसभेसाठी प्र.रा.देशमुख यांना पुन्हा उमेदवारी दिली. बॅ. अंतुले यांनी उमेदवारीमध्ये, दिल्लीतुन बदल करुन घेतला. प्र.रा.देशमुख यांनी बंडखोरी न करता बॅ.अंतुलेंचा प्रचार केल्यामुळे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण देशमुखांवर प्रसन्न होते. महाराष्ट्र शासनाने, ५ कोटीच्या कोकण विकास फंडापैकी तळे इंग्लिश स्कूलच्या इमारती बांधकाम खर्चापैकी निम्मे अनुदान देण्याचे कबूल केले. माध्यमिक शाळा इमारत बांधण्यासाठी शासनातर्फे अनुदान मिळण्याची पध्दत नाही. या अपवादात्मक परिस्थितीत यशवंतराव चव्हाणांनी आमदार प्र.रा.देशमुख यांच्या त्यागाकडे बघून **कोकण विकास फंडातून ३०,००० रुपये अनुदान दिले.**

इमारतीची वास्तूशांत डॉ.म.गं.जोशी यांच्या हस्ते झाली. इमारतीमध्ये ड्रॉईंग हॉल व लायब्ररी हॉल नसल्यामुळे इमारतीच्या मध्यभागावर मजला उभारण्याचे ठरले. संस्थेकडे निधी नव्हता. प्रभाकर देशमुख वेळोवेळी पैसे पुढे करत असल्यामुळे त्यांच्या परिवारात असंतोष निर्माण झाला होता. शाळेच्या बांधकामावर लक्ष ठेवण्यासाठी स्वतः माजी आमदार देशमुख व ड्रॉईंग शिक्षक गावडे सर शाळेतच सुमारे एक महिना झोपावयास येत. तळयाचे, सिव्हिल इंजिनिअर साठे बी.ई. यांनी लोडबेअरिंगचे आराखडे काढून दिले. प्रभाकर देशमुखानी प्रत्यक्ष देखरेख करुन काम एवढे मजबूत करुन घेतले की, ६० वर्षापूर्वीच्या या लोडबेअरिंग भिंतीवर मजला

बांधावयास हरकत नाही असे सर्टिफिकेट मिळाले आहे. बाह्य भिंतीवर रेतीची छाट मारली आहे ती खरवडून पण निघत नाही आणि त्याचकाळात शासकीय इमारती पडाचास लागल्या आहेत.

बांधकाम खर्च ९०,००० रुपये झाला. त्यातील फक्त १७,००० रुपये देणगी गोळा करण्यात आली होती. ३०,००० रुपये कोकण विकास फंडातून प्रभाकर देशमुखांनी मिळविले होते. ४०,००० रुपये ॲडव्हान्स विविध नागरिकांकडून घेतले होते. त्यातील ३०,००० रुपये प्र.रा.देशमुख व उर्वरित १०,००० रुपये डॉ.म.गं.जोशी, तात्यासाहेब जोशी, परशुराम अ. मेकडे, डॉ.अनंत मोरेश्वर श्रृंगारपुरे, भालचंद्र गो.साठे, नाना पालवणकर यांच्याकडून घेतले होते.

शाळेची इमारत पूर्ण झाल्यावर त्याचे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी करावे असे माजी आमदार द.मा.तळेगांवकर यांनी माणगांव तालुका विकास गटाचे नेते या नात्याने सचिवालयात पत्र पाठविले. मुख्यमंत्र्यांचा पी.ए. श्रीपाद डोंगरे यांनी, वेळेच्या अभावी मुख्यमंत्री आपले निमंत्रण स्वीकारणे कठीण आहे, त्याबद्दल दिलगिरी वाटते असे पत्र ७ ऑक्टोबर १९६१ रोजी पाठविले. इमारतीसाठी कर्ज झाले असल्यामुळे भव्य उद्घाटन केल्यास पुष्कळ खर्च येईल असे वाटल्याने शाळेचे औपचारिक उद्घाटन करण्याऐवजी वर्ग भरु लागले.

शाळा इमारतीचे किमतीप्रमाणे दरवर्षी भाडे मिळण्याचा नियम होता. नागरिक व्याजाची अपेक्षा करीत नव्हते परंतु मुद्दल परत मागत होते. ५ ते ६ % जरी भाडे मिळाले तरी ॲडव्हान्स घेतलेली रक्कम परतफेड करता येईल असा विश्वास असल्यामुळे त्यानी पैसे पुढे केले होते.

इमारत बांधल्यावर, शासनाकडून इमारत भाडे मिळविण्याचे प्रयत्न सुरु झाले परंतु शासनाने कळविले की शाळा बांधण्यासाठी अनुदान घेतले असल्यामुळे तुम्हाला भाडे देता येणार नाही. ॲडव्हान्स देणाऱ्यांचे धाबे दणाणले. अनेक शासकीय अधिकाऱ्यांना अर्ज विनंत्या करण्यात ५ वर्षे गेली.

प्र.रा.देशमुख यांनी तळयाचे सुपुत्र डॉ. चिंतामणराव देशमुख यांच्याशी संपर्क केला. त्यांनी ऑडीट केलेल्या जमाखर्चावर नजर फिरविली व अर्जाचा फेर-मसुदा सांगितला. त्यानुसार शासकीय अभियंताकडून इमारतीचे व्हॅल्यूएशन करुन घेतले. ते रुपये ८५,००० झाले. व्हॅल्यूएशनमधून अनुदानाचे ३०,००० रुपये कमी केल्यावर उर्वरित रक्कमेवर ५५,००० रुपयांवर वार्षिक भाडे मागीतले. ते दर वर्षी ५००० रुपये सुरु झाले. ॲडव्हान्सची परतफेड त्यातून सुरु झाली. ज्यांची रक्कम थोडी घेतली होती त्याना परतफेडीत प्राधान्य देण्यात आले.

भाडे रक्कमेपैकी ३००० रुपये दरवर्षी शाळेच्या देखभाल खर्चासाठी लागत असल्यामुळे देशमुख यांनी ॲडव्हान्स दिलेली रक्कमे १९७५ साल उजाडले तरीही फेड झाली नव्हती. १९६० साली सोन्याचा भाव १०० रुपये तोळा होता. व्यवहार संपविण्याची गळ घातल्यावर त्यानी व्यवहार पुरा झाल्याचे मान्य केले. मात्र या त्यागमूर्तीनी शाळेसाठी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्याकडून मिळविलेल्या रक्कमेची बोलवण शासनाने ३०,००० रुपये अनुदान दिले अशी रौप्य महोत्सवी स्मरणिकेत चुकभूलीने केली.

कोणत्याही हायस्कूलला **कोकण विकास फंडातून** अशा प्रकारचे अनुदान महाराष्ट्र शासनाने दिलेले नाही. ते मिळविणारे तळे इंग्लिश स्कूलचे संस्थापक प्रभाकर देशमुख यांचे यथोचित स्मारक संस्थेकडून झालेले नसल्यामुळे संस्थेचे नांव **स्वा.सै. प्रभाकर देशमुख शिक्षण संस्था** करावे अशी मागणी आली आहे.

डॉ. श्रीनिवास वेदक
प्रवर्तक तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळ
चेअरमन द.ग.तटकरे कॉलेज तळा

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळ

तळे हायस्कुल मा.ता.एज्यू.सोसायटीला संलग्न असल्यामुळे १९६० नंतर देणग्या गोळा करण्यास कोणीही बाहेर पडले नव्हते. माजी विद्यार्थांकडे देणग्या मागितल्यास, हस्तांतरण झाल्यावर देऊ असे सांगत असत. एका बैठकीत शाळेचे माजी विद्यार्थी बिल्डर नंदकुमार वेदक यांनी, तळे इंग्लिश स्कुलला माझ्या वडिलांचे नांव दिल्यास शाळेला लागणाऱ्या इमारतीच्या पन्नास टक्के खर्च मी द्यावयास तयार आहे असा प्रस्ताव मांडला. डॉ. श्रीनिवास वेदक यांची, गोरेगांवच्या संस्थेने तळे इंग्लिश स्कूलच्या स्थानिक कमिटीवर नेमणूक केली होती. तेथे त्यांना आढळून आले की, शाळेचे हस्तांतरण करुन घेण्यासाठी नोंदणीकृत संस्थाच तळे येथे नाही.

अशोक लोखंडे यांनी, काँग्रेस पक्षकार्य जोमाने सुरु केले होते. त्यांना संस्था स्थापावी लागेल असे सांगितल्यावर त्यानी संस्था स्थापण्यासाठी पुढाकार घेण्याचे कबुल केले. ते सर्वश्री श्रीकृष्ण देशमुख, डॉ. श्रीनिवास वेदक, महिपत गोळे हे डॉ.म.गं.जोशी यांच्या निवासस्थानी गेले. तेथे प्रवर्तकांची मिटिंग होऊन पुढील गोष्टी ठरल्या. संस्थेच नांव तळे शिक्षण प्रसारक मंडळ असे लोखंडे यांनी सुचविले. डॉ. वेदक यांनी सांगितले तळे ऐवजी तळे-विभाग असे केल्यास व्यापकता येईल. मांदाड, मजगांव, पढवण येथे शाखा स्थापन करून आपणांस ज्युनिअर कॉलेज व नंतर सिनिअर कॉलेज काढता येईल. डॉ.म.गं.जोशी यांच्या आधारानेच हस्तांतरण सुलभ होईल याची खात्री असल्यामुळे त्यांनाच अध्यक्षपद देण्याचे ठरले. पिटसईचे दगडू शिंदे गुरुजी यांचेकडे ग्रामीण भागाचा प्रतिनिधी म्हणून चिटणीसपद द्यायचे ठरले. **डॉ. म.गं.जोशींना १९५९ पासून १९८७ पर्यंत न्यायालयीन कारवाईत निष्कारण अडकविणाऱ्यांना आमंत्रण द्यावयाचे नाही असे ठरले.**

कोंडजाई देवी वार्षिक उत्सवाच्या निमित्त नंदकुमार वेदक तळे येथे येणार असल्यामुळे त्या मुहूर्तावर सभा आयोजित केली. तळे विभाग शि.प्र.मंडळाची स्थापना २९ डिसेंबर ८७ रोजी संध्याकाळी हायस्कूलच्या हॉलमध्ये डॉ.म.ग.जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. प्रत्येकी २५१ रुपये प्रमाणे खालील २१ नागरिक संस्थापक सदस्य झाले. सर्वश्री डॉ. महादेव गंगाधर जोशी, अशोक लक्ष्मण लोखंडे, श्रीकृष्ण प्रभाकर देशमुख, डॉ. श्रीनिवास प्रभाकर वेदक, नंदकुमार गो. वेदक, परशुराम अ. मेकडे, महीपत रामचंद्र गोळे, किरण दत्तात्रय देशमुख, सूर्यकांत लिमकर, डॉ. सतिश गोपिनाथ वडके, नारायण दत्तात्रय दलाल, ॲड. विद्याधर धामणकर, वसंत धोंडू लोखंडे, गंगाधर विनायक पिसाट, मधुकर शिवराम जाधव, करीम दांडेकर, महादेव गजानन रोडे, दगडू बाळाजी शिंदे, उपाध्यक्षपदी श्रीकृष्ण प्रभाकर देशमुख यांची निवड झाली. ॲड. विद्याधर धामणकर यांनी सचिव म्हणून काम करण्याची तयारी दर्शवली परंतू त्यास दूजोरा मिळाला नसल्यामुळे ठरल्याप्रमाणे दगडू शिंदे यांची चिटणीसपदी नेमणूक झाली. सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन श्रीकृष्ण देशमुख, अशोक लोखंडे व महिपत गोळे यांनी अलिबागमध्ये जाऊन धर्मादाय आयुक्तांकडे संस्थेची नोंदणी करण्यासाठी अर्ज केला.

गोरेगांव येथे हस्तांतरणाचा ठराव

१३ मार्च १९८८ मध्ये माणगांव ता.एज्यू.सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा गोरेगाव येथे झाली. तेथे तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाकडे तळे हायस्कूल हस्तांतरण करण्याचा ठराव डॉ. श्रीनिवास वेदक यांनी मांडला. अशोक लोखंडे यांनी अनुमोदन दिले. ॲड.आर.पी.दोशी, नथुराम भाई, राजाभाऊ मोने, श्यामभाई शेट यांच्या पुढाकाराने ठराव एकमताने मंजूर केला. हा ठराव मंजूर झाल्याचे कळताच भा.गो.साठे यांनी द्रोणागिरी ज्ञान प्रसारक मंडळ स्थापन केले. सदस्य संख्या होती अवघी ४, एकाच हेतूसाठी एका गावात दोन संस्था नकोत हे कारण देऊन धर्मादाय आयुक्तानी त्यांना रजिस्ट्रेशन नाकारले. तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाला, सोसायटी ॲक्ट खाली ६६/१९८८ हा क्रमांक १५ मार्च १९८८ रोजी मिळाला.

दूर्दैवाने अशोकशेठ लोखंडे यांना ८ मे १९८८ रोजी, पेण येथील काँग्रेस पक्षाच्या मिटिंगमध्ये हृदय विकाराने मृत्यु आला. महिपत गोळे या त्यांच्या सहकाऱ्याने पिटसई येथे त्यांचे स्मारक व्हावे म्हणून अशोक लोखंडे विद्यालय सुरु केले परंतु तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे काम थंडावले होते.

प्रभाकर भट यांनी धर्मादाय आयुक्तांकडे संस्थेविरुद्ध दावा केला परंतु तो दाखल करुन घेत नाहीत म्हणून दिवाणी न्यायालयात दाखल केला. त्याला स्टे मिळाला त्यावेळी माणगांव तालुका एज्युकेशन बोर्डाचे, तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाने प्रतिज्ञापत्र सादर करावे असा आदेश होता परंतु तो उठवण्यासाठी प्रयत्न झाले नाहीत.

तळे इंग्लिश-स्कूलची विद्यार्थी संख्या वाढत होती. दूबार व्यवस्था करुनही वर्ग खोल्या कमी पडत असल्यामुळे माणगांव तालुका एज्युकेशन कमेटीने दक्षिणयुग या साप्ताहिकांत जाहिरात दिली की तळे हायस्कुलच्या इमारतीवर, बँकेकडून कर्ज घेत आहोत. त्यातून नवीन वर्ग खोल्या बांधू.

तशा तऱ्हेचा कोणताही ठराव गोरेगांवच्या कार्यकारणीमध्ये झाला नव्हता. जाहिरात फसवी होती परंतु त्यावेळी कळली नव्हती. तळे येथून किरण देशमुख, मंगेश देशमुख व डॉ. प्रभाकर जोशी यांच्या नेतृत्त्वाखाली एक शिष्टमंडळ गोरेगांव येथील मंडळींना भेटावयास गेले. रोह्याहून डॉ. वेदकही गेले होते. आम्ही तळे येथील नागरिक, देणगी गोळा करून वर्ग खोल्या बांधून देऊ परंतु शाळेसाठी तुम्ही कर्ज काढू नका असे चेअरमन दोशी वकील यांना माजी विद्यार्थ्यांनी सांगितले.

नियोजीत बांधकाम कमेटीची स्थापना

तळे येथे आल्यावर उत्साही तरूणांनी डॉ. म.गं.जोशी यांच्या सल्ल्याने नियोजित बांधकाम कमेटी स्थापन केली. त्यांच्या प्रथम मिटिंगप्रमाणे माजी विद्यार्थ्यांकडून देणगी गोळा करुन शाळेच्या आवारातच वर्ग खोल्या बांधून शाळेच्या ताब्यात द्यावयाचे ठरविले. बांधकाम कमिटीने, २ लाखापर्यंत देणगी जमा झाल्यावर वर्ग खोल्या बांधण्याचे काम सुरु करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे परवानगी मागितली. श्रीकृष्ण प्रभाकर देशमुख त्यावेळी सरपंच होते. त्यानी सांगितले बांधकामासाठी जागेच्या मालकांकडुन परवानगीचा अर्ज आणावा लागेल.

देणगी रक्कमेतुन वर्ग खोल्या बांधून झाल्यावर महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम खात्याकडे वर्ग खोल्याचे भाडे मागितले. त्यांनी संस्थेचे नोंदणीपत्र मागितल्यावर त्या बांधकाम कमिटीने किरण देशमुख, डॉ. प्रभाकर जोशी, यांच्या पुढाकाराने **ज्ञानवर्धिनी** ही संस्था स्थापन करून नोंदणी केली परंतु तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाला कळविले नाही. सुदैवाने **तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळास २२ ऑगस्ट १९९० रोजी चॅरिटी कमिशनरकडून एफ -१४२५ हा देणगी गोळा करण्याचा नोंदणी क्रमांक मिळाला होता. तो अधिकृत क्रमांक चालु आहे.** या क्रमांकाने पैसे गोळा केले असते तर पुढची विसंगती सुरु झाली नसती.

बांधकाम खात्याकडे **ज्ञानवर्धिनी** या संस्थेने दिलेल्या अर्जाप्रमाणे, मुख्याध्यापकांच्या नावाने भाडे रक्कम चेकने दिली. त्या पैशातून नवीन बांधकाम सुरु केले. एकाच कार्याकरता एकाच गावात दोन संस्था नोंदणी करता येणार नाहीत असा पूर्वीच्या एका प्रकरणात चॉरिटी कमिशनरचा निकाल मिळाला होता.

ज्ञानवर्धिनीच्या तरुण कार्यकर्त्यांनी, शनिवार-रविवारी मुंबईला जाऊन सुमारे ४ लाख रु. जमविले. त्यात किरण देशमुख, नारायण दलाल, ॲड. विद्याधर धामणकर, मुकुंद मुळे, शशिकांत टिळक, महादेव रोडे आणि पटेल यांचा सहभाग होता. उत्साही नियोजित बांधकाम कमेटी देणगी गोळा करीत होती. त्यांना भा.गो.साठे, ज्ञानवर्धिनी संस्थेवर दावा लावणार नाहीत असा विश्वास होता परंतु तो खोटा ठरवून त्यांनी ज्ञानवर्धिनी संस्थेवर दावा दाखल केला. २ वर्ष तारखा पडत होत्या. शेवटी नंदकुमार वेदक यांनी पुन्हा पुढाकार घेतला आणि तडजोडीची बोलणी केली.

आपण सर्व मिळून गोरेगांव येथे जाऊन तेथील पदाधिकाऱ्यांना भेटून मार्ग काढू असे ठरल्यावर गोरेगांव येथे दोशी वकील, भगवानभाई, श्यामभाई या पदाधिकाऱ्याना भेटले. भगवान भाईंना स्टे संबंधी सांगितले की, 'स्टे म्हणजे स्थगिती ही चिरकालीन नसते.' तळे येथे आल्यावर कोर्ट प्रकरणांत लक्ष घालण्याचे नंदकुमार वेदक यांनी आश्वासन दिल्यावर तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाने कार्यवाही सुरु केली. मधल्या काळात रामचंद्र गोपाळ वर्तक यांनी आपले वडिलोपार्जित घर तेथील हक्कासह हायस्कूलच्या उपयोगासाठी दान दिले. डॉ. जोशींनी ती देणगी मातृसंस्थेकडे न घेता ज्ञानवर्धिनी या प्रासंगिक निर्माण झालेल्या संस्थेकडे वर्ग केली.

ज्ञानवर्धिनी संस्थेच्या पदाधिकाऱ्याना तळे विभाग शिक्षणप्रसारक मंडळाच्या सभांना बोलवण्याची तडजोड निघाली. तेथे ज्ञानवर्धिनीचे अध्यक्ष किरण देशमुख यांनी सांगीतले की, तळे हायस्कूल कर्जाच्या सापळयात अडकू नये म्हणून आम्ही माजी विद्यार्थ्यांकडून देणगी गोळा करुन वर्ग खोल्या बांधून देत आहोत. ज्या दिवशी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाकडे हस्तांतरण होईल त्यावेळी ज्ञानवर्धिनी संस्था मूळ संस्थेत विसर्जीत होईल. ज्ञानवर्धिनीचे बहुतेक सदस्य तळे विभाग शि.प्र.मंडळाचे सदस्य आहेत.

भालचंद्र गो.साठे यांनी केलेल्या कोर्ट केसला दहा वर्षे पूर्ण झाली होती. नविन कायद्यान्वये दिवाणी न्यायालयांत जी प्रकरणे १० वर्षे उभी राहिली नाहीत ती परस्पर निकाली निघतात. त्याप्रमाणे तळे हायस्कूल विरूध्दच्या केसेस १९९८ साली निकालांत निघाल्या.

आमदार सुनिल तटकरेंचे विशेष सहाय्य

रोहा-माणगांव मतदार संघाचे आ. सुनिल तटकरे यांना, श्रीकृष्ण देशमुख व महीपत गोळे यांनी सांगीतले की तुमच्या प्रत्यक्ष सहभागाशिवाय हे काम होणार नाही, त्यानी पूणे येथील शिक्षणाधिकाऱ्याची वेळ घेऊन ते तळे प्रसारक मंडळाच्या प्रमुख सदस्यांना बरोबर घेऊन त्यांना ४ तास भेटले. 'घेतल्याशिवाय जाईना' या कोकणी ऊक्तीप्रमाणे ऑर्डर त्याचदिवशी मंजूर करुन घेतली.

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या वार्षिक सभेत पुढील सदस्याची कार्यकारणीवर नेमणूक झाली. डॉ.म.गं.जोशी अध्यक्ष, श्री.प्र.देशमुख उपाध्यक्ष, प.अ.मेकडे, डॉ.श्री.प्र.वेदक, डॉ.सतिश वडके, किरण देशमुख, सूर्यकांत लिमकर, ॲड. विद्याधर धामणकर, अनंत वसंत लोखंडे, मंगेश प्र. देशमुख, नारायण दलाल हस्तांतरण होईपर्यंत डॉ.म.गं.जोशी यांनी अध्यक्षपद सांभाळावे असे ठरले.

नंदकुमार वेदक यांची भव्य देणगी

शाळेचा नियमित खर्च भागविणेही अशक्य होत होते. अकरावीचा वर्ग सुरु झाला होता. मार्ग काढण्यासाठी संस्था कार्यकारणीचे सदस्य, नंदकुमार वेदक यांना लोणेरे मुक्कामी भेटले. त्यांच्या दृष्टीला काही लोकांच्या नामकरण विरोधी हालचाली दिसत होत्या. त्यांनी सांगितले नामकरणासंबंधी संस्थेचा ठराव केल्यावरच मी देणगी देईन. त्यामुळे पुढील विस्तारीत कार्यकारी मंडळाच्या पुढील बैठकीत त्यांना बोलावून करारासंबंधी सांगोपांग चर्चा झाली. गोपीनाथ महादेव वेदक विद्यामंदिर हे नामकरण मंजूर झाले व ११ लाख रुपये देणगी देण्याचे ठरले. नंदकुमार वेदक यांनी नामकरण दिन भव्य स्वरूपांत करण्याचे ठरविले. वेदक यांचे मोठेपण एवढे की त्यांनी एकाही पदाची मागणी केली नाही.

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाची स्वप्ने

संस्था स्थापन करताना अशोक लोखंडे यांची भव्य स्वप्ने होती. तळे परिसरांतील बहुजन समाजालाही शिक्षणाची द्वारे उघडली जावीत ही त्यांची मनिषा होती. गावाच्या आजूबाजूला हायस्कूलस् झाली तरच तळे येथे कॉलेज चालू होईल. दुर्दैवाने त्यांचे देहावसान झाल्यावर आपल्या संस्थेचे एक प्रवर्तक महिपत बुवा गोळे यांनी पुढाकार घेऊन पिटसई विभाग ज्ञान प्रसारक मंडळ ही संस्था स्थापन केली. तळा शाळेत शालांत परिक्षा केंद्र नव्हते. ते मिळण्यासाठी कमीतकमी १५० विद्यार्थ्यांची गरज असते. पिटसईच्या अशोक लोखंडे या शाळेचे विद्यार्थीही तळे येथे परिक्षेसाठी येऊ लागल्यामुळे १९९३ मध्ये तळे हायस्कूल हे माध्यमिक शालांत परिक्षेचे केंद्र होऊ शकले.

ज्ञानवर्धिनीची माहिती तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाकडे उपलब्ध झालेली नसल्यामुळे सवडीने पुढील आढावा घेतला जाईल. या लेखनात काही कमी जास्त असल्याचे कोणी लक्षात आणून दिल्यास तशी दुरुस्ती केली जाईल.

शाळेवर प्रभाकर देशमुख दादांसारखे प्रेम करुन त्याग केला तर आपण त्या पुष्पहारातील एखादी पाकळी होऊ. माता-पित्याची, मातृभूमीची आणि शाळेची आठवण ठेवल्यावर जीवनाचा आनंद सहजी मिळत असल्यामुळे प्रत्येक माजी विद्यार्थ्यांने त्यासाठी प्रयत्न करावा लागेल.

डॉ. श्रीनिवास वेदक
प्रवर्तक तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळ
चेअरमन, द.ग.तटकरे कला आणि वाणिज्य महाविद्यालय तळे.

माजी विद्यार्थ्यांसाठी

गेली २० वर्षे शासन कोणत्याही अनुदानित शिक्षण सोसायटीस इमारतीचे वार्षिक भाडे देत नाही परंतु देखभाल खर्च नियमित चालू असतो.

१) वीज बिल
२) स्वच्छता
३) सुरक्षा
४) विद्युत उपकरणांची निगा
५) सी.सी.टी.व्ही.
६) सॅनिटरी पॅड्स त्यांचे निर्मूलन
७) इन्र्व्हटर
८) हे खर्च नियमित चालू आहेत. ज्या शाळा नगरपालिका हद्दीमध्ये असून त्यांच्या ताब्यात आहेत तेथे नगरपालिका नागरिकांकडून शैक्षणिक कर आकारुन व्यवस्था करते परंतु नगरपालिका हद्दीत त्यांच्या ताब्यात संस्था नसल्यास त्यांना खर्च करण्याची परवानगी नाही. तळे तालुक्यात एकमेव कॉलेज असल्यामुळे आपल्या कॉलेजला अनुदान मिळते परंतु वरील खर्चासाठी देखभाल खर्च मिळत नाही. हे पुष्कळ माजी विद्यार्थ्यांना माहिती नसते. त्यासाठी संस्था वेळोवेळी माजी विद्यार्थ्यांकडे देणगी मागते.